# व्यक्तिमत्व विकासात भाषेचे मोठे योगदान - डॉ.काझी एम.के.देळुबकर






देगलूर - प्राचीन काळापासूनच भाषेला अत्यंत महत्त्व असून विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेसह वेगवेगळ्या भाषेचे अद्यावत ज्ञान आत्मसात करून शुद्ध भाषेचा प्रयोग केला पाहिजे त्यामुळे व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन डॉ.काझी एम.के.यांनी केले ते देगलूर महाविद्यालय, देगलूर येथील हिंदी विभागाच्यावतीने राजभाषा हिंदी दिवसानिमित्त आयोजित हिंदी दिवस समारोह या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ हे होते तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापकीय सदस्य डॉ.अशोक टिप्परसे, कार्यक्रमाचे संयोजक तथा हिंदी विभाग प्रमुख डॉ.संतोष येरावार, डॉ. खंदकुरे व्यंकट,पटेल एम.एम.,डॉ. शेख परवीन यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले की हिंदी भाषा ही जगातील समृद्ध भाषा असून त्यास प्राचीन वारसा लाभलेला आहे. ती भारतीय संस्कृतीची वाहक असून राष्ट्रीय चेतना प्रवाहित करीत असते. विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेसह वेगवेगळ्या भाषेचे शुद्ध ज्ञान आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. हिंदी भाषेत समृद्ध साहित्य परंपरा असून, राजभाषा,

पान ४ वर ▷▷

# आजचे जग स्पर्धेचे नसून सादरीकरणाचे आहे!

## यशदा पुणे येथील संशोधन आधिकारी डॉ. बबन जोगदंड





देगलूर - विद्यार्थ्यांना जीवनामध्ये प्रगती करायची असेल तर त्यांनी नवनवीन कौशल्य शिकली पाहिजे, नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे, त्याचबरोबर इंग्रजी भाषा शिकली पाहिजे. आजचे जग हे स्पर्धेचे नसून सादरीकरणाचे आहे, असे मत यशदा पुणे येथील अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी व्यक्त केले.

ते देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने आयोजित केलेल्या अभ्यासपूरक व्याख्यानात प्रमुख मार्गदर्शक म्हनुण बोलत होते. विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास व स्पर्धा परीक्षा या विषयावर डॉ. बबन जोगदंड यांचे आज व्याख्यान झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, लोकप्रशासन विभागाचे प्रमुख डॉ.बालाजी कतुरवार व डॉ. देबडे सर यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. जोगदंड म्हणाले की,विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये उच्च शिक्षण घेतच आपल्यामध्ये अंतर्गत नवनवीन कौशल्य विकसित केले पाहिजे. त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास, संभाषण कला, भाषण कला, काव्य लेखन याबरोबरच वाचन कला जोपासली पाहिजे.

विद्यार्थ्यांना कोणते अभ्यासक्रम पूर्ण करता येतील व नोकरीच्या भविष्यामध्ये काय संधी असतील याबद्दलही त्यांनी भाष्य केले. जीवनामध्ये संवाद कौशल्य, इंग्रजी भाषा, संगणकाचे ज्ञान, आत्मविश्वास आणि कष्ट ही पंचसूत्री अंगीकारावी असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना आपले बेसिक ज्ञान सुधारावे त्याचबरोबर इय्यता ४ थी ते १० वीचे पाठ्यपुस्तकांचा परत अभ्यास करावा, परिस्थितीला न घाबरता पुढे जाण्यासाठी समर्थपणे प्रयत्न करावेत. प्रयत्न

पान ४ वर ▷▷

Scanned with OKEN Scanner